**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - ०५/१०/२०२३

**दि.०४/१०/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**<u>भाग १ ते ५ चे गुन्हे</u>**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ७८०/२०२३ भादवि का क ३८५,३८७,३२३,५०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०४/१०/२०२३ रोजी सायं. १८/४५ वा. चे सुमारास चाकण येथील मार्केट रोडवरील बिग बझार मॉल मध्ये ता खेड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०४/१०/२०२३ रोजी २३.१२ वा |
| फिर्यादी | :- | यासीन युनुस मोहंमद, वय २७ वर्षे, धंदा- बिग बजार व्यवसाय, रा. ग्रिन इस्टेट, ए ६०४, चाकण ता. खेड जि. पुणे मुळ रा. घर नं. १२-६८, आयशा मंजिल हुडे, सोनसे वेस्ट, उडपी कर्नाटक |
| आरोपी | :- | आकाश चंद्रकांत घोडके वय २३ वर्षे, रा. जयभारत चौक चाकण ता खेड जि पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी चाकण येथील मार्केट रोडवरील फिर्यादीचे बिग बझार मॉल मध्ये आरोपी येवुन फिर्यादीचा कामगार फारीश यास धक्का देवुन हा मॉल तुम्ही कसा काय चालु केला, हा मॉल बंद करा, मॉल चालवायाचा असेल तर मला एक हजार रुपये हप्ता दयावा लागेल, असे म्हणुन चाकुने मारण्याची धमकी देत हप्ता देण्यास नकार दिल्यास मॉल पेट्रोल टाकुन जाळुन टाकण्याची धमकी दिली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि सुकाळे ,९५९४९६८१११ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ५९२ /२०२३ भा.द.वि.कलम ४५२,१४३,१४९,३२३,५०४,५०६ महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय सेवा व्यक्ती बाबत घडणा-या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि वैद्यकीय सेवा संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच तस संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम २०१० चे कलम ३,४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०४/१०/२०२३ रोजी १७.३० वा.ते १७.४५ वाचे सुमारास खराबवाडी ता.खेड जि.पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०४/१०/२०२३ रोजी २२.१० वा. |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय ४० वर्षे |
| आरोपी | :- | ०५ महीला आरोपी **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे अभिणव हॉस्पीटल, खराबवाडी येथे काम करत असतांना तेथे अचानक ५ ते ६ महिला येवुन फिर्यादीची कोणतीही पुर्वपरवानगी न घेता रिसेप्शनिस्ट यांना सुध्दा त्या महिलांनी कोणतीही ओळख व नाव पत्ता न सांगता येवुन फिर्यादीस उद्देशुन बोलु लागल्या की, तुम्ही क्लेमची खोटे कामे करता, आमचेकडे तुमचे विषयी तक्रार आलेली आहे. असे बोलुन त्यांनी अचानक फिर्यादीचे टेबल वरील फाईली उचकण्यास सुरुवात केली. त्या कोण आहेत याबाबत काहीएक माहिती नसल्याने व केबिनमध्ये हॉस्पिटलमधील पेशंटची सर्व उपचार संबंधाचे फाईली असल्याने फिर्यादी यांनी त्यांना फाईली घेण्यास प्रतिकार केला. तेव्हा त्या महिलांनी फिर्यादीस शिवीगाळ करत झटपट सुरु करुन टेबलवरील फाईल घेवु लागल्या. त्यांचे गोधळामुळे हॉस्पिटलमधील आजारी पेशंट व लहान बाळ यांना त्रास झाला असुन फिर्यादीने त्यांच्या हातातील अंगठी काढुन टेबलवर ठेवली होती ती कोठेतरी पडुन गहाळ झालेली आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि जाधव ९९२२९४७६२३ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ५८८/२०२३ भादवि कलम ३२४,३२३,५०४,५०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०३/१०/२०२३ रोजी १८.३० वा चे सुमारास मौजे खराबवाडी ता.खेड जि पुणे इंडीयन् ऑईल पेट्रोल पंप सहारा सीटी रोड येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०४/१०/२०२३रोजी०२/०५ वा. |
| फिर्यादी | :- | अजय रविंद्र तरकसे वय २१ वर्षे धंदा मजुरी राखराबवाडीताखेड जि पुणे,मुळ रा. मु.धावडी पो आडस ता.आंबाजोगाई जि.बिड |
| आरोपी | :- | १.विजय रविंद्र तरकसे वय १९ वर्षे रा पंकजखराबी यांचे रुम मध्ये भाड्यानेखराबवाडी<br>२.विवेक अंगद मिसाळ वय २० वर्षे राखराबवाडीताखेड जि पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा भाउ आरोपी क्रं १ व फिर्यादी यांची घरगुती कारणावरुन भांडणे चालु असताना आरोपी क्रं १ याचा मित्र आरोपी क्रं २ याने तु माझ्या मित्राला का मारहाण करतो असे म्हणुन फिर्यादी यांचे घरातील कांदा कापण्याचे सुरीने फिर्यादीचे उजव्या हाताचे दंडावर मारुन जखम केली व आरोपी क्रं १ याने त्याचे हातातील लाकडी फळीने डोक्यात मारुन अपखुशीने दुखापत केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोफौ थेऊरकर ९८२३६२४७१६ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ९९०/२०२३, भा.द.वि कलम ३७९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१८/०९/२०२३रोजी ते दिनांक २७/०९/२०२३ रोजी १५.०० वाजण्याचे सुमारास संत तुकाराम नगर मेट्रो स्टेशनच्या खाली ,पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०४/१०/२०२३ रोजी १४.३१ वा. |
| फिर्यादी | :- | कल्याणराव दौलतराव विधाते, वय ५९ वर्षे, सहायक व्यवस्थापक (सुरक्षा), पुणे मेट्रो, कृषी महाविदयालय आवार, शिवाजीनगर, पुणे मेट्रो, एम्प्लॉयमेट आय.डी. क्रमांक ७७३ |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोरटयाने संत तुकारामनगर मेट्रो स्टेशनच्या खालुन २४,०००/- रु किं चे केजी १५०अे -१२ व्होल्ट - १५० ॲम्पीयर कोयल (किर्लोस्कर ऑईल इंजिन लिमिटेड) ग्रीन कंपनीचे ०२ नग चोरून नेले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा ५६९/जाधव ९५५२५७४३१६ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत ३४८/२०२३ भा.दं.वि.स. कलम २७९,३०४(अ) सह मो.वा.का. कलम १८४ १३४/१७७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०३/१०/२०२३ रोजी १५/०० वा. सागर वाईन दुकाणासमोर, पुणे-मुंबई कडे जाणा-या हायवे रोड वाहीनीवर, पुनावळे, ता.मुळशी जि.पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०४/१०/२०२३ रोजी १९.१७ वा. |
| फिर्यादी | :- | बिकी उदय करमोकार वय २३, धंदा बिगारी ,रा सध्या महिंद्रा कंपनी लेबर कॅम्प ,ताथवडे , ता मुळशी |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी याचा मित्र व फिर्यादी हे मुंबई कडे जाणा-या हायवे रोडवरून रोड क्रॉस करत असताना फिर्यादी याने रोड क्रॉस केला पण फिर्यादीचा मित्र -भोलाराम बेल तन्ती,वय ३३ वर्षे, रा. महिंद्रा कंपनी लेबर कॅम्प, ताथवडे ,मुळ रा. मु. कचरी गाव, जि. सिलीतपुरा, राज्य आसाम हा रोड क्रॉस करीत असताना कोणत्यातरी अज्ञात वाहनावरील अज्ञात चालकाने त्यास ठोस देऊन जबर जखमी करून त्याच्या मृत्यूस कारणीभुत झाला आहे म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | रविंद्र पन्हाळे, पोलीस उप निरीक्षक, ९४२१९०७६०५ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ९६१/२०२३ भा.द.वि. कलम ४०६,४२० प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१०/०४/२०२३ ते दिनांक ३०/०४/२०२३ दरम्यान ज्योतिबा गार्डन जवळ, पवना नगर, काळेवाडी, पुणे. याठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि.०४/१०/२०२३ रोजी २१/२४ वा. |
| फिर्यादी | :- | मधुकर गोविंद पाटील, वय ४२ वर्षे, धंदा नोकरी, रा. फ्लॅट नं. १०१, वेदिका अपार्टमेंट, साई राज कॉलनी, तापकीर नगर, काळेवाडी, पुणे. |
| आरोपी | :- | आकाश विष्णु पाडाळे, रा. तुंगार्ली, कैवल्यधाम, लोणावळा, पुणे. **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मित्र राजेश जाधव याने फिर्यादीची व नमुद आरोपी यांची ओळख करुन दिली होती. आरोपीने मी फयुचर ग्रुपचे व क्रेडीट कार्ड चे काम करीत असतो तुमचे काही काम करायचे असेल तर सांगा असे फिर्यादीस सांगितल्याने फिर्यादीने त्यांचे बजाज फयनान्स आर.बी.एल क्रेडीट कार्डचे प्रॉब्लेम झाले आहे पैसे भरुन देखील जास्त बिल दाखवत आहे असे सांगितल्यावर आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादीचे क्रेडीट कार्ड स्वताकडे घेवुन फिर्यादी यांच्या बजाज फायनान्स आर.बी.एल. क्रेडीट कार्ड वरुन २१,२४७/- रु., ट्रान्सफर केले व फिर्यादी यांच्या नावे फ्लीपकार्ड वरुन बजाज फायनान्सचे ऑनलाईन लोन करुन ९५,१६३/- रु. किं. ची टि.व्ही. खरेदी केले तसेच रिलायन्स डिजीटल, मुंबई पुणे हायवे, चिंचवड याठिकाणी फिर्यादी यांच्या नावे एच.डी.एफ.सी. बॅकेचे लोन करुन ०१,०७,८९९/- रु. किं. चा आय फोन १४ प्लस मोबाईल खरेदी करुन फिर्यादी यांच्या साध्या भोळया स्वभावाचा फायदा घेवुन फसवणुक करुन फिर्यादी यांचे एकुण २,२४,३०९/- रुपयांची अर्थिक फसवणुक केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | एम.के.मणेर, पोलीस उप निरीक्षक ९५४५३४१४६२ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ४६९/२०२३ भादवी कलम ४२७, ५०६(२), ३४, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१)(३) सह १३५, क्रिमीनल लॉ अमेंडमेंड ॲक्ट. कलम ०७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०३/०९/२०२३ रोजी २१.४५ वा. सुमा अष्टविनायक सोसायटी, गजानन महाराज नगर, स्वराज कॉलणी, दिघी, येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि. ०४/१०/२०२३ रोजी ०३/५८वा |
| फिर्यादी | :- | मनोज श्रीरंग कदम वय ३१ वर्षे, धंदा व्यावसाय, रा. रूम नं. २, अष्टविनायक सोसायटी, गजानन महाराज नगर, स्वराज कॉलणी, दिघी, पुणे. |
| आरोपी | :- | १.विशाल वारे,२.आकाश सोनावणे, ३.राम मोहन देवकाते वय २० वर्षे रा. महादेवनगर, चक्रपाणी, भोसरी ४. ओंमकार विनोद लोयरे वय २० वर्षे रा. लांडेवाडी विठठल नगर, भोसरी **आरोपी ३ व ४ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी नमुद आरोपी यांचे विरोधात एन.सी. दिली होती त्या गोष्टीचा राग मनात धरून आरोपी अष्टविनायक सोसायटी, येथे येवून हेतुपुर्वक हातामध्ये कोयते, प्लेवर ब्लॉक, दगड, विठा, काठी बाळगुन फिर्यादीचे तसेच फिर्यादीचे गल्लीतील इसमांच्या गाडयांचे खोडशाळपणे नुकसान करून, शिवीगाळी करून, हातात कोयता घेवुन जिवे ठार मारण्याची धमकी देवुन, परीसरात दहशत निर्माण केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि कटपाळे, ८६५२१७७२७२ |